# ऋषिकेश खैरे यांच्याहस्ते समर्थनगर येथे भुमीगत गटार योजनेचा शुभारंभ

## नागेश्वरवाडी, समर्थनगर दरम्यान होणार भुमीगत गटार योजना

**संभाजीनगर ( ता.१० ) :** स्मार्ट सिटीच्या दिशेने महापालिकेने पाऊले उचलली असुन त्यामध्ये प्रत्येक वॉर्ड स्मार्ट व्हावा, करिता प्रत्येक नागरिक व नगरसेवक प्रयत्न करिता आहे. याच उद्देशाने आज समर्थनगर-नागेश्वर दरम्यान असलेल्या भोईवाडा पुल येथे भुमीगत गटार योजनेचा शुभारंभ नगरसेवक ऋषिकेश खैरे यांच्याहस्ते करण्यात आला.

यावेळी नगरसेविका किर्ती शिंदे, माजी सभागृहनेता आनंद तांदुळवाडीकर, सुधीर जाधव, आशुतोष डंख आदिंची उपस्थिती होती.

शहरात बऱ्याच ठिकाणी भुमीगत ड्रेनेजचे कामे प्रगतीपथावर असुन वॉर्डातंर्गत ड्रेनेज, पाईपलाईन, नवीन चेंबर, नाले सफाईची कामे सुरु आहेत. या उदघाटन प्रसंगी खिल्लारी कन्स्ट्रक्शनचे टि.एल. भुसाळ, विलास भारेकर, अन्वर शेख, विभागप्रमुख विनोद बोरखडे, सौ. किरण शर्मा, देवेंद्र तरटे, शिवप्रसादनारायण शहाणे , शिवाजी पाथ्रीकर, महेंद्र शिंदे, कांता गाढे , शुभम भालेराव, प्रतिक जाधव आदिंसह वॉर्डातील नागरिकांची उपस्थिती होती.

**प्रसिध्दीप्रमुख**

**गणेश वाघ/मनोज वडगावकर**